बिगर राज्य नागरी सेवेतून (Non-SCS) भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीच्या शिफारशीसाठी पात्रता निकष (Bench Mark Criteria) विहित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एआयएस-१३१९/प्र.क्र.२६५/२०१९/दहा**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२,
तारीख: **१०.०७.२०१९**

संदर्भ:-

१) वित्त विभाग शासन निर्णय क्र. अरजा-२४०२/२५/सेवा-८, दि. ०७.१०.२००२,
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एआयएस-१३१०/प्र.क्र.५६३/२०१०/दहा, दि.०७.०९.२०११,
३) केंद्र शासन कार्मिक व प्रशिक्षण विभाग, नवी दिल्ली यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र. १४०१५/३०/ २०१५-AIS-I, दि. २०.०३.२०१५,
४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एआयएस १३१६/प्र.क्र.५४/२०१६/दहा, दि.०८.०२.२०१६,
५) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एआयएस १३१७/प्र.क्र.४५/२०१७/दहा, दि.०४.०२.२०१७ आणि तद्नुषंगिक समक्रमांकित दि.२३.०२.२०१७ आणि दि.१९.०४.२०१७ ची शुध्दीपत्रके,
६) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एआयएस १३१८/प्र.क्र.३२/२०१८/दहा, दि.२०.०१.२०१८,
७) सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. एआयएस १३१८/प्र.क्र.३२/२०१८/दहा, दि.२८.०२.२०१८,
८) सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र. एआयएस १३१९/प्र.क्र.२६५-भाग-१/२०१९/दहा, दि.०९.०७.२०१९.

प्रस्तावना-

भारतीय प्रशासन सेवेत नियुक्तीचे खालीलप्रमाणे तीन मार्ग विहित करण्यात आले आहेत,-

१) स्पर्धा परिक्षेद्वारे सरळसेवेने नियुक्ती (Appointment by Competitive Examination)
२) राज्य नागरी सेवेतून पदोन्नतीने नियुक्ती (Appointment by Promotion)
३) बिगर राज्य नागरी सेवेतून निवडीने नियुक्ती (Appointment by Selection)

उपरोक्त मार्गापैकी वरील अ.क्र. ३ येथील नियुक्ती, भाप्रसे (निवडीने नियुक्ती) विनियम, १९९७ मधील तरतूदीनुसार केली जाते. या विनियमातील नियम ४ (iii) प्रमाणे पात्रता धारण करणाऱ्या अधिकाऱ्यांमधून १:५ (१ पद ५ अधिकारी) या प्रमाणात अधिकाऱ्यांची शिफारस निवडीने नियुक्तीकरीता संघ लोकसेवा आयोगाकडे करणे आवश्यक आहे.

सन २०१८ च्या निवडसूचीसाठी बिगर राज्य नागरी सेवेतून भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीसाठी संघ लोकसेवा आयोगाकडे शिफारस करण्याकरीता खालीलप्रमाणे पात्रता निकष (Bench Mark Criteria) विहीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

शासन निर्णय

भाप्रसे (निवडीने नियुक्ती) विनियम, १९९७ मधील नियम ४ (iii) नुसार निवडीने नियुक्तीसाठी अधिकाऱ्याने पुढीलप्रमाणे पात्रता धारण करणे आवश्यक आहे:-

*अ) अत्युत्कृष्ट गुणवत्ता व क्षमता,*
*ब) राजपत्रित पदावर स्थायीकरण झालेले असावे,*
*क) उप जिल्हाधिकारी या पदाशी समकक्ष घोषित पदावर निवडसूची वर्षाच्या दि. ०१ जानेवारी रोजी (दि.०१.०१.२०१८) किमान ८ वर्षे सेवा झालेली असावी.*
*ड) निवडसूचीच्या वर्षाच्या दि.०१ जानेवारी रोजी (दि.०१.०१.२०१८) त्याचे वय ५६ वर्षांपेक्षा जास्त नसावे.*

*२. प्रत्येक मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने सदर विभागाअंतर्गतच्या **प्रत्येक सेवेतील** (सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र. एआयएस-१३१९/प्र.क्र.२६५-भाग-१/२०१९/१०, दिनांक ०९.०७.२०१९ अन्वये विहित केलेल्या) उपरोक्त अ.क्र. अ), ब), क) व ड)*

*येथील पात्रता धारण करणाऱ्या, **प्रत्येकी कमाल २० अधिकाऱ्यांच्या** नावांचा प्रस्ताव (संबंधित अधिकाऱ्यांच्या लेखी इच्छुकतेसह) या विभागास पाठवावा. असा प्रस्ताव पाठविताना ज्या अधिकाऱ्यांच्या १० गोपनीय अभिलेखांपैकी किमान ९ गोपनीय अभिलेख अत्युत्कृष्ट दर्जाचे आहेत असा सेवाज्येष्ठ अधिकारी वगळला जाणार नाही याची संबंधित प्रशासकीय विभागाने दक्षता घ्यावी. तसेच गोपनीय अहवालांची गणना करताना खालील कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.*

*i) सन २०१८ या निवडसूची वर्षाकरीता ३१ मार्च, २०१८ पर्यंतचे मागील सलग १० वर्षांचे सर्व संस्करण पूर्ण होऊन अंतिम झालेले गोपनीय अभिलेखच विचारात घेण्यात यावेत. अशा मागील १० वर्षांपैकी ९ किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीचे गोपनीय अभिलेख अत्युत्कृष्ट असणे आवश्यक आहे.*

*ii) वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. अरजा-२४०२/२५/सेवा-८, दि. ०७.१०.२००२ नुसार मागील १० वर्षाच्या कालावधीत विशेष असाधारण रजेवर असलेल्या अधिकाऱ्यांचे गोपनीय अभिलेख शॉर्ट लिस्टींगकरीता विचारात घेताना त्यांच्या विशेष असाधारण रजेचा कालावधी वगळून ३१ मार्च, २०१८ पर्यंतचे मागील सलग एकूण १० वर्षाच्या कर्तव्य कालावधीचे गोपनीय अहवाल शॉर्ट लिस्टींगकरीता विचारात घेण्यात यावेत.*

*iii) अत्युत्कृष्ट गोपनीय अहवालांची गणना करताना एखाद्या गोपनीय अहवाल वर्षात ६ महिने अथवा त्यापेक्षा जास्त कालावधीचा गोपनीय अहवाल उपलब्ध असेल तर सदर गोपनीय अहवालाची जी प्रतवारी असेल ती संपूर्ण वर्षाची प्रतवारी समजण्यात यावी. तसेच जर एखाद्या गोपनीय अहवाल वर्षात प्रतिवेदन/पुनर्विलोकन अधिका-यांचा कालावधी ३ महिन्यांपेक्षा कमी असल्याच्या कारणास्तव/सक्तीचा प्रतिक्षा कालावधी असल्याच्या कारणास्तव (केवळ प्रशासकीय कारणास्तव) ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीची NRC असेल तर त्याच वर्षीच्या उपलब्ध असलेल्या जास्त कालावधीच्या उर्वरित गोपनीय अहवालाची प्रतवारी ही त्या संपूर्ण वर्षाची प्रतवारी समजण्यात यावी. तसेच प्रशासकीय कारणाव्यतिरिक्त अन्य कारणास्तव (रजा/वैध कारणास्तवची ना अहवाल प्रमाणपत्रे) ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीची NRC असेल तर त्या संपूर्ण वर्षाची प्रतवारी NRC समजण्यात यावी.*

*iv) केंद्र अथवा राज्य शासनाकडून आयोजित / पुरस्कृत / राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीने घेतलेल्या प्रशिक्षणाच्या कारणास्तव ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीची NRC असेल तर त्याच वर्षीच्या उपलब्ध असलेल्या कालावधीच्या उर्वरित गोपनीय अहवालाची प्रतवारी ही त्या संपूर्ण वर्षाची प्रतवारी समजण्यात यावी.*

*तसेच केंद्र अथवा राज्य शासनाकडून आयोजित / पुरस्कृत / राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीने घेतलेल्या प्रशिक्षणाच्या कारणास्तव एक वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीचा गोपनीय अहवाल उपलब्ध नसेल तर त्यांच्या सदर प्रशिक्षणाचा कालावधी वगळून दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंतचे मागील सलग एकूण १० वर्षाच्या कर्तव्य कालावधीचे गोपनीय अहवाल शॉर्ट लिस्टींगकरिता विचारात घेण्यात यावेत.*

*३. बिगर राज्य नागरी सेवेतून भाप्रसेमध्ये निवडीने नियुक्तीकरिता सन २०१८ च्या निवडसूचीकरिता ४ पदे उपलब्ध असल्यामुळे संघ लोकसेवा आयोगास २० अधिका-यांची नांवे पाठविणे आवश्यक आहे. तद्नुषंगाने मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची काळजीपूर्वक छाननी केल्यानंतर, संघ लोकसेवा आयोगाने बिगर राज्य नागरी सेवेतून भारतीय प्रशासन सेवेत नियुक्तीकरीता विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या आधारे, तसेच या मार्गदर्शक तत्वांमध्ये संघ लोकसेवा आयोगाने बदल केल्यास त्याप्रमाणे आस्थापना मंडळ क्र. १ मार्फत (लेखी परीक्षा, सेवा ज्येष्ठता, गोपनीय अहवाल आणि मुलाखतीच्या आधारे) १:५ (१ पद : ५ अधिकारी) याप्रमाणे निवडीने नियुक्तीकरीता संघ लोकसेवा आयोगास अधिकाऱ्यांची शिफारस करण्यात येईल. सदर शिफारशी करण्यासाठी Shortlisting करिता आस्थापना मंडळ -१ मार्फत खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबिण्यात येईल.*

*३.१ Short Listing करिता १०० गुणांची विभागणी- २० गुण लेखी चाचणी, १० गुण सेवा ज्येष्ठता, ५० गुण गोपनीय अहवालांकरिता आणि २० गुण मुलाखतीकरिता अशी राहील.*

*३.२ उपरोक्त प्रमाणे मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून प्राप्त झालेल्या विहित पात्रता निकष पूर्ण करणा-या सर्व अधिका-यांना लेखी परीक्षेकरिता बोलविण्यात येईल.*

*३.३ लेखी परीक्षा आणि सेवाकालावधीचे गुण एकत्रित करुन गुणानुक्रमानुसार पहिल्या ६० अधिकाऱ्यांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.*

*३.४ उपरोक्त ६० अधिका-यांचे लेखी परीक्षा, सेवाकालावधीचे गुण, गोपनीय अहवाल आणि मुलाखतीचे गुण एकत्रित करुन गुणानुक्रमानुसार पहिल्या २० अधिका-यांच्या नावाची शिफारस संघ लोकसेवा आयोगास करण्यात येईल.*

४. भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीच्या शिफारशीकरीता विहीत निकष पूर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागामार्फत, मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून मागविण्यात यावेत. या निवड प्रक्रीयेकरीता संघ लोकसेवा आयोगाने वेळापत्रक विहीत केले असल्याने, त्यानुसार प्रक्रीया वेळेत पार पाडण्याच्या दृष्टीने, दि.१६.०८.२०१९ पर्यंत साप्रवि, कार्यासन- १० मध्ये प्राप्त होणारे प्रस्तावच विचारात घेण्यात येतील .

५. उपरोक्त पात्रता निकष (Bench Mark Criteria) हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून होण्याऱ्या प्रक्रियेस भावी परिणामाने (With Prospective Effect) लागू होईल.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१०१२१४०२७५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Sitaram Janardan Kunte
Date: 2019.07.10 16:46:09 +05'30'

**(सीताराम कुंटे)**
**अपर मुख्य सचिव (सेवा)**

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
४. महालेखापाल, मुंबई/नागपूर,
५. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
६. सचिव, कार्मिक व प्रशिक्षण विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली,
७. सचिव, संघ लोकसेवा आयोग, नवी दिल्ली,
८. सर्व मंत्र्यांचे खाजगी सचिव,
९. सर्व मंत्रालयीन विभाग,
१०. निवड नस्ती.